जनसंपर्क अधिकारी कार्यालय,पुणे शहर पोलीस
P.R.O. Office, Crime Branch, Pune City
**Address** – Office of The Commissioner of Police, Pune City Sadhu Vaswani Road, Pune Maharashtra – 411001
**E-Mail ID :** crimepress.pune@gov.in **Ph.**020 / 26122478

पुणे पोलीस
Pune Police

स्वस्ति श्रीराज्याभिषेक शके ३५०

## प्रेसनोट क्रमांक - ४७७ दिनांक -१५/११/२०२४

गुन्हे शाखा युनिट-६

### अटकेत असलेल्या आरोपीचे कब्जातुन दोन अग्निशस्त्रासह दोन जिवंत काडतुसे जप्त

आगामी विधानसभा निवडणुक २०२४ च्या अनुशंगाने मा.वरिष्ठांचे आदेशाने कायदा व सुव्यवस्था राखणेसाठी गुन्हे प्रतिबंधक कारवाई तसेच बेकायदेशीर हत्यार, अग्निशस्त्र वापरणारे यांचे विरोधात कडक कारवाईचे आदेश करण्यात आले आहे.

सदर आदेशाचे अनुशंगाने दि.०७/११/२०२४ रोजी गुन्हे शाखा युनिट ६ चे कार्यक्षेत्रात मागील आठवडयात काळेपडळ पोलीस ठाणे येथे गु.र.नं.१२४३/२०२४, आर्म ॲक्ट कलम ३,२५ महाराष्ट्र पोलीस अधिनियम १९५१ चे कलम ३७ (१) (अ) सह १३५ अन्वये गुन्हा नोंद करण्यात आलेला आहे. त्यातील आरोपी नामे साहिल राजु शेख, वय २४ वर्षे, रा.३८ मॅजेस्टिक पार्क,बी बिल्डिंग, फ्लॅट नं.१२०६, वडाची वाडी रोड,उंड्री,पुणे यांचे कडुन एक देशी बनावटीचे लोखंडी पिस्टल व दोन जिवंत काडतुसे हस्तगत करण्यात आली होती.

सदर गुन्हयाचे अधिक तपासा दरम्यान दि.१०/११/२०२४ रोजी सदर गुन्हयाचे कामी **आरोपी नामे जैद जावेद खान वय २२ वर्ष रा. फ्लॅट नं २०३ गणराज स्वप्नपुर्ती फेज २ हांडेवाडी पुणे** याचे कडुन तपास करून त्याचे कब्जात बेकायदेशीरीत्या विनापरवाना अग्निशस्त्र बाळगलेले निष्पन्न झाले असता त्याचे कडुन दोन देशी बनावटीचे लोखंडी अग्निशस्त्र व दोन जिवंत काडतुसे हस्तगत करण्यात आली आहेत.

सदरची कामगिरी मा.अप्पर पोलीस आयुक्त (गुन्हे) श्री शैलेश बलकवडे, मा.पोलीस उपआयुक्त (गुन्हे) श्री निखिल पिंगळे, मा.सहा.पोलीस आयुक्त (गुन्हे) श्री.राजेंद्र मुळीक यांचे मार्गदर्शनाखाली गुन्हे शाखा, युनिट -६ चे प्रभारी पोलीस निरीक्षक वाहिद पठाण, सहा.पोलीस निरीक्षक मदन कांबळे, पोलीस उपनिरीक्षक अविनाश लोहोटे,पोलीस उपनिरीक्षक रामकृष्ण दळवी, पोलीस अंमलदार रमेश मेमाणे, बाळासाहेब सकटे, पोलीस अंमलदार नितीन मुंढे, कानिफनाथ कारखेले, ऋषीकेश ताकवणे ,सचिन पवार, ऋषीकेश व्यवहारे, गणेश डोंगरे, शेखर काटे, नितीन धाडगे, सुहास तांबेकर, महिला पोलीस अंमलदार प्रतिक्षा पानसरे, किर्ती मांदळे यांनी केली आहे.